महाराष्ट्र शासन

महाराष्ट्र वन विभाग

"वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे"

# उप वनसंरक्षक, अलिबाग यांचे कार्यालय, अलिबाग

मु.पो.हिराकोट तलावाजवळ अलिबाग ता.अलिबाग जि.रायगड पी.नं. ४०२ २०१

दूरध्वनी क्र ०२१४१-२२२०१६/२२२२१६ Email ID:dycfalibag@mahaforest.gov.in

जावक क्रमांक: अ/२०/जमिन/वसं/396/२०२३-२४. दिनांक: 7/6/२०२३.

प्रति,

मुख्य वनसंरक्षक,
ठाणे

विषयः- वन जमिन रायगड

पेण - खोपोली (०.००० कि.मी ते ३३.३२९ कि.मी.) सेक्शन ऑफ एनएच-१६६ डी मधील रस्त्याचे रुंदीकरणाकरीता वनजमिन मागणी प्रस्ताव ...क्षेत्र ९.९२४९ हेक्टर

संदर्भः- १) शासनाकडील पत्र क्र. एफएलडी-१३२३/प्र.क्र.१२४/फ-१०, दिनांक २१/०४/२०२३

२) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, म.रा.नागपूर यांचेकडील पत्र क्र. कक्ष-१७/नोडल/ठाणे/आयडी-१३७२७(७९)/२७०, दिनांक २४/०४/२०२३.

३) आपलेकडील पत्र क्र. कक्ष-१०/वसं/प्र.क्र.२८/२२-२३/७२, दिनांक २४/०४/२०२३.

४) या कार्यालयाचे पत्र क्र. ब/२०/जमीन/वसं/३५२, दिनांक ०४/०५/२०२३

५) प्रकल्प यंत्रणेकडील पत्र क्र. NHD/Pen/PB-५/Pen-Khopoli/९१७, दि.१६/०५/२०२३

उपरोक्त संदर्भित पत्र क्र. १ अन्वये वन (संवर्धन) अधिनियम १९८० अंतर्गत पेण- खोपोली (०.००० कि.मी ते ३३.३२९ कि.मी.) सेक्शन ऑफ एनएच-१६६ डी मधील रस्त्याचे रुंदीकरणाकरीता ९.९२४९ हेक्टर वन जमिन मागणी प्रस्तावांत १ ते ४ मुददे उपस्थित करणेंत आलेल्या आहेत. त्याअनुषंगाने सदर्भित पत्र क्र. २ व ३ अन्वये सदर मुददयांची पुर्तता करून अहवाल सादर करणेबाबत कळविणेंत आले आहे.

त्या अनुषंगाने प्रकल्प यंत्रणेकडील संदर्भिय पत्र क्र. ४ अन्वये सदर मुददयांची पूर्तता अहवाल सादर करणेत आलेला आहे. त्यानुसार खालील प्रमाणे पूर्तता अहवाल सादर करणेत येत आहे.

| अ.नं. | काढणेत आलेल्या त्रुटी | त्रुटींची केलेली पुर्तता |
|---|---|---|
| १ | उप वन संरक्षक, अलिबाग यांनी ऑन लाईन पार्ट -२ मध्ये अ.क्र. २ येथे वळतीकरणासाठी प्रस्तावित जमिन ९.८८५५ आणि अ.क्र. ३ व ४ येथे ९.४२४९ असे नमूद केले आहे. सबब, त्यामध्ये ९.९२४९ अशी सुधारणा करून ऑनलाईन पार्ट २ सादर करावा. | परिवेश प्रणालीवर पार्ट २ मध्ये आवश्यकते सुधारणा करून सुधारित ऑनलाईन पार्ट २ या सोबत सादर केला आहे. |
| २ | प्रस्तावित जमिनीच्या बहुतांश ७/१२ उताऱ्यावर खाजगी व्यक्तींची नावे आहेत. तसेच ७/१२ उत्ताऱ्यावर | प्रस्तुत प्रस्तावात मौजे धावटे, पिंपळगांव, कामार्ली, गागोदे बुद्रुक, ता. पेण व मौजे ताकई, अंजोशी, ता. खालापुर येथील वनक्षेत्र बाधीत होत आहे. प्रस्तावात |

| | | |
|---|---|---|
| | भोगवटादार वर्ग-२, कुळ कायद्याने प्राप्त जमिन, हेटवणे प्रकल्पाकडे जाणाऱ्या रस्त्यासाठी व कालव्यासाठी भूसंपादन कलम ४ अन्वये संपादित जमिन, वन अधिनियम कलम ३५ मधून मुक्त, बाळगंगा नदी प्रकल्पासाठी संपादित, संरक्षित कुळ, पेण खोपोली रस्ता रुंदीकरणासाठी संपादित क्षेत्र अशा प्रकारच्या नोंदी आहेत. मौजे पिंपळगाव आणि गागोदे बुद्रुक येथील खाजगी वनजमिन चौकशीवर प्रलंबीत असा शेरा लिहून, वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत वळतीकरणासाठी प्रस्तावित केली आहे. सदर जमिन वनजमिन असल्याचा कोणताही उल्लेख ७/१२ उताऱ्यावर दिसून येत नाही. त्यामुळे सदर जमिनीला वन (संवर्धन) अधिनियम, १९८० च्या तरतुदी लागू होतात किंवा कसे, याबाबत पुनश्चः तपासणी करून, माहिती सादर करावी. | वनक्षेत्र म्हणून नमुद केलेले क्षेत्रास वनाचे तरतुदी लागू आहेत, जरी महसुल अभिलेखात वनाचे नोंदी नसल्या तरी इकडील अभिलेखाप्रमाणे सदरचे क्षेत्र हे वनाचे असल्याने वळतीकरणासाठी प्रस्तावित करण्यात आले आहे. |
| ३ | प्रकल्प यंत्रणेने खाजगी हक्क धारकांचे ना-हरकत प्रमाणपत्र सादर करावे. | प्रकल्प यंत्रणेचे पुर्तता अहवालानुसार "सदर रस्ता राज्य मार्ग दर्जाचा असताना सार्वजनिक बांधकाम विभागाकडून यापूर्वीच सन १९७२ ते १९७९ दरम्यान भूसंपादन होऊन सरासरी ३० मीटर हद्द ही या विभागाच्या ताब्यात आहे. वळतीकरणासाठी प्रस्तावित केलेले क्षेत्र हे अस्तित्वातील, पूर्व भूसंपादित हद्द क्षेत्र असल्याने व सदर क्षेत्र शासनाचे असल्याने खाजगी हक्क धारकांचे ना-हरकत प्रमाणपत्र सादर करण्याचा प्रश्न उद्भवत नाही" असे नमुद केले आहे. |
| ४ | वळतीकरणासाठी प्रस्तावित केलेल्या मौजे पिंपळगाव, गट नं. २७/२, ३०, मौजे कामार्ली, सर्व्हे नं. ४४pt., आणि गागोदे खुर्द, गट नं. ८, १३२, १४१बी येथील तसेच पर्यायी वनीकरणासाठी प्रस्तावित केलेल्या मौजे शिहू ता रोहा, कक्ष नं. २०९ येथील क्षेत्राचे अधिकार अभिलेख सादर करावेत. | सदर मुददयांचे अनुषंगाने प्रकल्प यंत्रणेकडून सादर केलेले मौजे पिंपळगाव ता. पेण येथील गट नं. २७/२, ३०, गागोदे बुद्रुक ता. पेण येथील गट नं. ८, १३२, १४१बी या क्षेत्राबाबत महसुल अभिलेख व ७/१२ सोबत सादर केले आहे.<br>प्रस्तावात बाधीत होणारे मौजे कामार्ली ता. पेण येथील सर्व्हे नं. ४४pt, चे क्षेत्र हे राखीव वनाचे असून ते बिननंबरी असल्याने महसुल अभिलेखात ७/१२ उपलब्ध नाही.<br>प्रस्तावित पर्यायी वनीकरणाकरीता मौजे शिहू ता. रोहा येथील राखीव वन कंपार्टमेंट नं. २०९ चे क्षेत्र हे |

| | | |
|---|---|---|
| | | राखीव वनाचे असून ते बिननंबरी असल्याने महसुल अभिलेखात ७/१२ उपलब्ध नाही. तरी सोबत अधिसुचनेच्या प्रती सादर केली आहे. |

सोबत वरील प्रमाणे दस्तऐवजांचे ४ प्रतीत या सोबत जोडून सादर केल्या आहेत. तरी पुढील कार्यवाही होणेस विनंती आहे.

(आशिष ठाकरे, भा.व.से.)
उप वनसंरक्षक,
अलिबाग.

सहपत्रः- वरील प्रमाणे.

प्रतिलिपीः-अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, म.रा.नागपुर यांचेकडे माहितीसाठी सादर.
प्रतिलिपीः- कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय महामार्ग विभाग, पेण रायगड यांचेकडे माहितीसाठी रवाना.